# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# नागरीकांची सनद

## Citizen's charter



# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन



### आता थांबू नका स्वत:चा व्यवसाय सुरू करा

- तुमच्याकडे कौशल्य आहे.
- पण धंधा सुरू करायला भांडवल नाही.
- स्वत:च्या व्यवसायाची आखणी सुरू करा.
- तुमच्याकडे आत्मविश्वास आहे.
- गरिबीने खचून जायचे दिवस संपले
- स्वयंरोजगारासाठी बँकेतून कर्ज मिळते.

**गरिबीशी करा दोन हात,**
**तुम्हांस मिळे शासनाची साथ**

### बचत गट सुरू करा

### गरिबीवर मात करा

साऱ्याजणी एकत्र या. शासकीय योजनांची माहिती घ्या.
समाज विकास संस्था व बचत गट स्थापन करा.
बचत गटाच्या नावाने बँकेत पैसे जमा करा.
अडचणीच्या वेळेला बचत गटातून कर्ज घ्या.
सावकारी पाशातून मोकळ्या व्हा.
शासन बचत गटाला सहाय्य करते.

**मिळून साऱ्याजणी,**
**करू भविष्याची आखणी**





### साऱ्याजणी मिळून

### गरिबीवर मात करू

- तुम्हाला अनेक गोष्टी येतात.
- तुम्ही एकत्र येऊन विविध व्यवसाय करू शकता.
- झेरॉक्स सेंटर चालवू शकता.
- गांडुळखत प्रकल्प उभारू शकता.
- गरिबीशी लढायला साऱ्याजणी एकत्र या.
- कौशल्याचे व्यवसायात रूपांतर करा.
- परिस्थिती बदलून टाका.
- शासनाकडून महिला व्यवसाय गटाला मोठया प्रमाणावर अर्थसहाय्य मिळते.

**एकत्र या व्यवसाय करा,**
**सन्मानाने जीवन जगा.**

**अधिक माहितीसाठी महानगरपालिका येथील दारिद्रय निर्मुलन कक्षाला भेट द्या.**


# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

# प्रास्ताविक

## ∂ शहराचा इतिहास

भिवंडी शहराला ऐतीहासीक पार्श्वभूमी आहे. हा भाग पुर्वी कोळवन या नावाने ओळखला जात होता. इसविसनाच्या पुर्वी हा भाग नाणेघाट व बोरघाट यांच्यामध्ये व्यापाराचे एक महत्वाचे बंदर होते. या बंदरातून जगातील इतर बंदरात तेल, कापूस, तांदूळ व मिठाची निर्यात होत होती. हा भाग विणकाम व हाताने बनविलेली साडी याकरीता ही प्रसिध्द होता. आर्य लोकांच्या आगमनानंतर यात फरक पडला, विशेषतः इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांनी लावलेल्या शोषक करप्रणालीमुळे हा व्यवसाय अगदीच डबघाईला आला होता. भारताला स्वातंत्र प्राप्त झाल्यानंतर वरीलपैकी बऱ्याच गोष्टी बदलल्या परंतु काही परंपरा अजुनही चालू आहे.

हा प्रदेश प्राचिन काळातील भूप्रदेशीय खणनातून निर्माण झालेला आहे. इथे प्राप्त प्राचीन घटकाद्वारे इसवीसन पुर्व ३००० वर्षापुर्वीच्या खुणा आढळून येतात. याभागाने फार पुर्वीपासून बदलांचा काळ अनुभवलेला आहे.

कालओघाने महत्वाचे बंदर व औद्योगीक नगरी म्हणून नावाजलेल्या शहराची हातसाडी प्रसिध्द होती. शहरात तयार झालेले कापड जरी हाताने बनविलेले असले तरी अगदी उत्तम प्रतिचे कापड येथे तयार होत होते.

याप्रदेशावर खुप युध्द लढली गेली. काही काळानंतर सदरच्या प्रदेशावर एका मोठ्या राजाने राज्य केले. त्याच्या काळात भिवंडी शहर हे एक नाविक बंदराच्या बाबतीत स्वयंपुर्ण झाले. परकीयांच्या आक्रमणापासून सुरक्षितेसाठी बंदरांचा विकास केला गेला. भिवंडीचे बंदर हे सर्वात सुरक्षित बंदर होते.

भिवंडी शहरातील लोक हे उद्योगप्रिय आहेत. त्यामुळेच भिवंडी शहर हे उद्योग नगरी म्हणून उदयास आलेले आहे.

## ∂ शहराची माहिती

सन २००१ च्या जनगणनेनुसार भिवंडी शहराची लोकसंख्या पाच लाख अठ्ठयाण्णव हजार सातशे एक्केचाळीस एवढी आहे. शहरातील बहुतांशी लोकसंख्या ही कापड उद्योग व इतर उद्योगातील कामगारांचीच आहे. शहरातील सर्वात पहीला माग कारखाना श्री. खान साहेब समद सेठ यांनी १९२७ मधे सुरु केला.

भिवंडी शहरात कोळी लोकांची लोकसंख्या अधिक होती. कोकण भागातील कोळी लोकांचा पारंपारिक व्यवसाय मासेमारी आहे. आजही मासेमारीकरिता काही प्रमाणात लाकडी बोटी शहरातील खाडी किनाऱ्यालगत आढळून येतात.

कोकणकिनारपट्टीच्या सखल भागात अरबी समुद्रातील निमुळत्या खाडी प्रदेशाने वेढलेले आहे.

## ∂ शहराचे ठिकाण

भिवंडी शहर हे महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्हात १९ डिग्री ३० मि. ०० सें. उत्तर अक्षांश व ७३ डिग्री ०६ मि. ०६ से. अंश पुर्व रेखांशावर समुद्र सपाटीपासून २४ मिटरवर वसलेले आहे. यंत्रमाग उद्योगाचे भिवंडी शहर हे भारताच्या आर्थिक राजधानी मुंबईपासून ४८ किलोमीटर अंतरावर आहे. कोकण किनारपट्टीच्या सखल भागात अरबी समुद्रातील निमुळत्या खाडी प्रदेशाने वेढलेले आहे.

## ∂ शहराचे क्षेत्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये २६.३६ चौरस किलोमिटर इतक्या क्षेत्राचा समावेश आहे. भिवंडी शहराने सुमारे ५,९८,७४१ लाख (२००१ च्या जणगणनेनुसार) लोकसंख्या सामावुन घेतलेली आहे. भिवंडी शहरात उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, आंध्रप्रदेश व चेन्नई येथील क्षेत्रातून येणारी लोकसंख्या खुपच मोठी आहे.

## प्रशासकिय विभाग

निजामपूरा, भिवंडी, गौरीपाडा, कणेरी या गावांचे एकत्रीकरण होऊन भिवंडी नगरपालिका १० ऑक्टोबर १८६६ मधे अस्तित्वात आली. त्यानंतर सन १९८३-८४ मधे नागांव, पोगांव चाविंद्रा, नारपोली, कामतघर, फेणे, टेमघर, भादवड या गांवाचा नगरपालिकेत समावेश करण्यात आला.

दि. १६ डिसेंबर २००१ रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची स्थापना झाली असून महानगरपालिकेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी महापौरांबरोबर एक महानगरपालिका आयुक्त हे महानगरपालिकेचे सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी आहेत. त्यांचे खालोखाल उपआयुक्त (मुख्यालय), उपआयुक्त (कर), सहाय्यक संचालक नगररचना, शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक हे अधिकारी येतात.

त्यानंतर मुख्य लेखाधिकारी, नगरचनाकार, कार्यकारी अभियंता (पा.पु.), कार्यकारी अभियंता (विद्युत), सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, सिस्टीम मॅनेजर, विधी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख इत्यादी अधिकारी आहेत.

भिवंडी महानगरपालिका पाच प्रभाग समिती कार्यालये व ८४ प्रभागात विभागलेली आहे. प्रत्येक प्रभाग हा सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकाऱ्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे.

**भिवंडी महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| वर्ग १ | - | २० |
| वर्ग २ | - | ३४ |
| वर्ग ३ | - | ८९७ |
| वर्ग ४ | - | ६०९ |
| सफाई कामगार | - | २४६१ |
| एकुण | - | ४०२१ |

भिवंडी महानगरपलिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी पोलीस उपआयुक्त परीमंडळ २ यांचे कार्यालय आहे. तसेच भिवंडी नगरपालिका अधिनियमानुसार अग्निशमन दल दि. ०२/१०/१९६३ रोजी स्थापन करण्यात आले आहे.

## ∂ हवामान आणि पर्जन्यमान

भिवंडी शहरात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. तो सर्वसाधारणपणे जूनच्या पहिल्या पंधरवाड्यात सुरु होतो आणि ऑक्टोबरच्या पहील्या आठवड्यापर्यंत टिकून राहतो. एप्रिल ते मे मध्ये पर्जन्यपूर्व सरी येतात. काही वेळा, इशान्य मोसमी वाऱ्यांपासून ऑक्टोंबर व नोव्हेंबरमध्ये पावसाच्या सरी येतात. परंतु संपूर्ण पावसाळ्यात त्या दोन पेक्षा अधिक वेळा क्वचितच येतात.

भिवंडी शहरातील सरासरी कमाल तापमान ३३ अंश सेल्सियस इतके व सरासरी किमान तपमान २३ अंश सेल्सिअस इतके आहे.

## ∂ नदयांचे प्रवाह

उत्तरपश्चिम भागात सुमारे ३ किमी. पसरलेली कामवारी ही एकमेव नदी भिवंडी शहरात आहे.

## ∂ जनसांख्यिकीय वैशिष्टये

ठाणे जिल्हयात असलेल्या एकूण १५ तालुक्यांपैकी भिवंडी हा १० वा तालुका आहे. भिवंडी शहराची एकूण लोकसंख्या ७,११,३२९ (संदर्भ : भारतीय जनगणना २०११ नुसार) असून ठाणे आणि कल्याण शहरांनंतर भिवंडी शहर सर्वात मोठी लोकसंख्या म्हणून तिसऱ्या क्रमांकावर गणले जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| क्षेत्रफळ | : | २६.३६ चौ.कि.मी. | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| लोकसंख्या | : | ५,९८,७४१ | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| पुरूष | : | ३,६७,५६५ | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| स्त्रीया | : | २,३१,१७८ | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| लोकसंख्येची घनता | : | २२,७१४ चौ.कि.मी. | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| दशकातील वाढलेली टक्केवारी | : | ५८.१६ टक्के | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| शैक्षणिक दर | : | ७५.८ टक्के | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| लिंगप्रमाण | : | ६२९ | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| घरांची संख्या | : | १,१०,४०८ | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |
| कामकरी लोकसंख्येचा सहभाग | : | ६० टक्के | (भारतीय जनगणना २००१ नुसार) |

(यापैकी कामगार ४०.६ टक्के, सिमान्त कामगार १.२ टक्के आणि कामगार नसलेले ५८.२ टक्के)

## ∂ शासकीय व निमशासकीय आस्थापना

भिवडी शहरात महानगरपालिका कार्यालय, प्रांत कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पोलिस उपआयुक्त परीमंडळ २, पोस्ट कार्यालये, वखार महामंडळ, मराविम, रेशन, भुमी अभिलेख, दुय्यम निबंधक, भारतीय स्टेट बँक यासांरखे शासकीय व निमशासकीय आस्थापने आहेत

## ∂ ऐतिहासिक व धार्मिक व पर्यटन स्थळे

भिवंडी शहरातील ऐतिहासिक स्थळे पुढीलप्रमाणे

दिंडेश्वर मंदिर (क वर्ग) (जिल्हा नियोजन समिती मान्य)

## ∂ करमणूक केंद्र

भिवंडी शहरात एकूण १४ सिनेमागृह असून एक नाट्यगृह आहे.

## ∂ सामुहीक संपर्क स्थळे

भिवंडी शहरात महानगरपालिकेचे एकूण २६ सांस्कृतीक केंद्र आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिके तर्फे उभारण्यात आलेले कै. परशुराम टावरे स्टेडीअम, चॅलेंज स्पोर्टस व भादवड ग्राऊंड देखिल आहे.

## ∂ विजपुरवठा केंद्र व विद्युत संच माडणी (प्रेषण केंद्र)

फार मोठ्या औद्यौगीक व नागरी क्षेत्रात असलेल्या भिवंडी शहराची गरज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ या सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपनीमार्फत पुरविली जाते. पडघा व नेतीवली येथील विज उपकेंद्रातून अनुक्रमे ५०० मेगा वोल्ट ॲम्पीयर व १०० मेगा वोल्ट ॲम्पीयर मिळूण एकूण ५५० मेगा वोल्ट ॲम्पीयर क्षमेतेचे दोन केंद्र आहेत व त्या केंद्रामधून भिवंडी शहरास विजेचा पुरवठा केला जातो, भिवंडी शहरात टेमघर, कल्याण रोड, कांबा, कलरकेम, इदगाह रोड येथे एकूण चार उपकेंद्रे आहेत. उच्चदाब आणि पुरवठ्याचे ग्राहक धरून विजेची मागणी ८०० मेगा वोल्ट ॲम्पीयर इतकी आहे. ग्राहकांची एकूण संख्या खालीलप्रमाणे.

| विज बिल कनेक्शन | संख्या | वापरात येणारे मेगा युनिट |
|---|---|---|
| रहिवाशी | १,२५,६६१ | ११६.८३ |
| व्यापारी | २९,९४९ | ७४.२९ |
| औद्योगिक | ४८,२८५ | १९३७.४७ |
| इतर | ८७३ | ३२०.३८ |

## पाणीपुरवठा

भिवंडी शहराला शहाड टेमघर प्राधिरणाकडून (स्टेम) मार्फत ७३ दशलक्ष लिटर प्रतिदिवस व बृह्नमुंबई महानगरपालिकेकडून ३५ दशलक्ष लिटर प्रतिदिवस आणि महानगरपालिकेच्या मालकिचे वऱ्हाळदेवी तलावमार्फत २ दशलक्ष लिटर प्रतिदिवस असे एकूण ११० दशलक्ष लिटर प्रतिदिवस इतका पाणी पुरवठा शहरास केला जातो. सदरचा पाणी पुरवठा शहरातील १५ टाक्यांमधून केला जातो. भिवंडी शहरास १५० दशलक्ष लिटर प्रतिदिवस इतक्या पाण्याची गरज आहे. ग्राहकांची एकूण संख्या अंदाजे ६० हजार इतकी आहे.

## ∂ स्वच्छता

भिवंडी महानगरपालिकेत २४६१ सफाई कर्मचारी असून १० आरोग्य निरिक्षक व ३३ सफाई इन्चार्ज मिळून शहरातील ३३ आरोग्य सफाई कॅबीनवर काम पाहत असतात. शहरातून सुमारे ३०० टन दररोज कचरा उचलला जातो व डंपींग ग्राऊंडवर सदरचा कचरा डंपींग केला जातो. भिवंडी शहरात प्रभाग समिती निहाय औषध फवारणी पथक असून विशेष औषध फवारणी पथक मुख्य आरोग्य विभागातुन कार्यरत केला जातो.

# वाहतुक व दळणवळण यंत्रणा

## ∂ राष्टीय महामार्ग

भिवंडी बायपास रोडवरून मुंबई-नाशिक, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई-आग्रा रोड - जुना राष्ट्रीय महामार्ग - ३, ठाणे - नाशिक महामार्ग आणि कल्याण - भिवंडी रोड जातात.

## ∂ रेल्वे स्टेशन

भिवंडी शहराच्या हद्दीत भिवंडी रोड रेल्वे स्टेशन असून भिवंडी शहरापासून १५ किमी ठाणे आणि १२ किमी वर कल्याण शहर वसलेले आहे. या शहरात जाण्यासाठी इतर साधनांच्या सोयी आणि रस्ते भिवंडी शहराला जोडलेले आहेत. त्यामुळे या शहरांत जाण्यासाठी रेल्वेवर अवलंबून रहावे लागत नाही.

## ∂ विमानतळ

भिवंडी शहरापासून ६० किमी अंतरावर वसलेल्या मुंबई शहरात विमान तळाची सोय आहे.

## ∂ वाहतूक यंत्रणांचा तपशिल

| | |
|---|---|
| राष्ट्रीय महामार्गाची संख्या | ३ |
| नद्यांवरील पुलांची संख्या | ४ |
| एसटी आगाराची संख्या | १ |
| रस्ता पुलांची संख्या | २ |
| रेल्वे स्थानकांची संख्या | १ |
| रेल्वे पुलांची संख्या | १ |
| हेलीपॅडची संख्या | २ |
| (भिवंडी महाविद्यालय, आदर्श पार्क) | |

# <u>महानगरपालिका प्रशासन</u>

भारतीय संविधानच्या अनुच्छेद २४३ (थ), खंड २ अन्वये अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी शहर महानगरपालिका/नगरपालिका स्थापन करण्यात येतात.

ज्या नगरपालिका शहरांची लोकसंख्या नजिकच्या जनगणनेवेळी ३ लाखापेक्षा जास्त झालेली आहे अशा शहरांसाठी महानगरपालिका स्थापन करण्यात येते. महाराष्ट्र राज्यात आजमितीस २२ महानगरपालिका अस्तित्वात आहेत.

त्यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रशासकीय कारभार मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८ अन्वये चालतो.

नागपूर महानगरपालिकेचा प्रशासकीय कारभार नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ नुसार चालतो.

उर्वरित २० महानगरपालिकांचा प्रशासकीय कारभार, **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९** नुसार चालतो. भारतीय संविधानाच्या **७४ व्या घटना दुरुस्तीने** महानगरपालिकांना/नगरपालिकांना अधिक **स्वायत्तता** देण्यात आलेली आहे. महानगरपालिका स्तरावर **आयुक्त,** हे कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असतात.

**<u>वर्गीकरण-</u>** महानगरपालिकांचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, महानगरपालिकांचे स्वतःच्या स्त्रोतातील उत्पन्न या बाबी विचारात घेऊन राज्यातील २२ महानगरपालिकांचे खालील प्रमाणे अ,ब,क आणि ड या चार वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे. या वर्गीकरणाबाबत प्रत्येक जनगणनेनंतर आढावा घेऊन फेरवर्गीकरण करण्यात येणार आहे.

**"अ" वर्ग-** बृहन्मुंबई महानगरपालिका (१)

**"ब" वर्ग-** नागपूर,पुणे महानगरपालिका (२)

**"क" वर्ग-** पिंपरी-चिंचवड,ठाणे,नाशिक,नवी मुंबई महानगरपालिका (४)

**"ड" वर्ग-** सोलापूर, औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाड शहर, कोल्हापूर, अहमदनगर, नांदेड-वाघाळा, जळगांव, धुळे, मालेगांव,मिरा-भाईंदर, अकोला कल्याण-डोंबिवली, **<u>भिवंडी-निजामपूर</u>**, उल्हासनगर, अमरावती महानगरपालिका ,**वसई, विरार, लातूर, परभणी, चंद्रपूर.**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी व दुरध्वनी तपशील

| अ.क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | मा. आयुक्त कार्यालय | ०२५२२-२५३९५१ |
| ०२ | मा. उप-आयुक्त (मुख्या) कार्या. | ०२५२२-२५७११९ |
| ०३ | मा. उप-आयुक्त (कर) कार्या. | ०२५२२-२२२५०० |
| ०४ | मा. महापौर कार्यालय | ०२५२२-२५००५६ |
| ०५ | मा. उप-महापौर | ०२५२२-२५००१७ |
| ०६ | मुख्य लेखाधिकारी कार्या. | ०२५२२-२५००४७ |
| ०७ | नगरसचिव कार्यालय | ०२५२२-२५००५२ |
| ०८ | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. ०१ | ०२५२२-२२०५२४ |
| ०९ | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. ०२ | ०२५२२-२२३५५५ |
| १० | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. ०३ | ०२५२२-२५००२५ |
| ११ | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. ०४ | ०२५२२-२२३३३१ |
| १२ | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. ०५ | ०२५२२-२५५३३७ |
| १३ | कार्यकारी अभियंता रोषणाई | ०२५२२-२५००५० |
| १४ | शहर अभियंता(पाणीपुरवठा) | ०२५२२-२२६८११ |
| १५ | वरिष्ठ उप-अभियंता | ०२५२२-२५००५३ |
| १६ | आस्थापना विभाग | ०२५२२-२२०१९२ |
| १७ | विधी विभाग | ०२५२२-२५७८५५ |
| १८ | आय.जी.एम.हॉस्पीटल | ०२५२२-२२८७२७/२२६२८० |
| १९ | मुख्य आपत्ती विभाग | ०२५२२-२५००४९/२२३८८८ |
| २० | परवाना विभाग | ०२५२२-२२९९५५ |
| २१ | पर्यावरण विभाग | ०२५२२-२५२५६५ |
| २२ | भांडारगृह आरोग्य | ०२५२२-२५४९०२ |
| २३ | भांडारगृह बांधकाम | ०२५२२-२५०३८१ |
| २४ | शिक्षण मंडळ | ०२५२२-२५२०४३ |
| २५ | बी.जी.पी.दवाखाना | ०२५२२-२५१०५० |
| २६ | मिनाताई ठाकरे रंगायतन | ०२५२२-२५२१०३ |

| अ.क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| २७ | स्टेम प्राधिकरण | २५२२-२४८३६०/२२३७१८ |
| २८ | वाहन विभाग | ०२५२२-२५७९५९/२२३७१८ |
| २९ | वॉटर सप्लाय विभाग | ०२५२२-२३०५०० |
| ३० | जकात विभाग (मुख्य कार्या.) | ०२५२२-२२६८९० |
| ३१ | आरोग्य विभाग | ०२५२२-२५४१५२ |
| ३२ | अग्निशमन विभाग (मुख्य) | ०२५२२-२२०५०० |
| ३३ | स्थायी समिती सभापती | ०२५२२-२५००१२ |
| ३४ | सभागृह नेता कार्यालय | ०२५२२-२५००४७ |
| ३५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय | ०२५२२-२२२२७८ |

# अनुक्रमणीका


०१ **सार्वजनीक आरोग्य विभाग**

- भुयारी गटाराबाबत
- भुयारी गटार नलीका दुरुस्ती

०२ **वैद्यकीय विभाग**

- लसीकरण
- किरकोळ सेवा
- आरोग्याची निगा

०३ **जन्म - मृत्यु नोंदणी विभाग**

०४ **शहर विकास विभाग**

०५ **नगररचना विभाग**

०६ **सार्वजनीक बांधकाम विभाग**

- रस्ते दुरुस्ती

०७ **उद्यान / वृक्षसंवर्धन विभाग**

०८ **विद्युत विभाग**

- रस्ता दिवाबत्ती
- नाटयगृह
- इतर

०९ **पाणी पुरवठा विभाग**

- नळ जोड देणे
- किरकोळ स्वरुपाची कामे
- बिलाबाबत
- संकिर्ण

१० **अग्निशमन विभाग**

११ **परवाना विभाग**

१२ **मार्केट विभाग**

१३ **करसंकलन विभाग**

१४ **जकात विभाग**

१५ **लेखा विभाग**

१६ **पर्यावरण विभाग**

# परिशिष्ट "अ"

## महानगरपालिका/नगरपालिका यांच्याकडून पुरविण्यात येणा-या नागरी सेवा

### ७ सार्वजनिक आरोग्य

| अ.क्र | विभागाचे नांव | आवश्यक कागदपत्रे | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | रस्ते / गटार साफसफाई | सन्मा. सदस्य अथवा स्थानिक नागरिकांच्या लेखी व तोंडी अथवा भ्रमणध्वनीद्वारे तक्रार | २ दिवस | संबंधित प्रभाग समितीचे आरोग्य निरीक्षक व प्रभाग अधिकारी तसेच मुख्य |
| २ | कचरा कुंडीतील कचरा हलविणे | सन्मा. सदस्य अथवा स्थानिक नागरिकांच्या लेखी व तोंडी अथवा भ्रमणध्वनीद्वारे तक्रार | २ दिवस | संबंधित प्रभाग समितीचे आरोग्य निरीक्षक व प्रभाग अधिकारी तसेच मुख्य |
| ३ | ड्रेनेज लाईन साफ करणे | सन्मा. सदस्य अथवा स्थानिक नागरिकांच्या लेखी व तोंडी अथवा भ्रमणध्वनीद्वारे तक्रार | कमाल १० दिवस | ड्रेनेज सफाई इन्चार्ज व आरोग्य निरीक्षक व तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक (मुख्या.) |
| ४ | सेप्टीक टँक साफ करणे | नागरीकांचा लेखी अर्ज | कमाल ३ दिवस | ड्रेनेज सफाई इन्चार्ज व मुख्य आरोग्य निरीक्षक (मुख्या.) |
| ५ | आरोग्य विषयक ना हरकत दाखला | अध्यक्ष व सेक्रेटरी यांचे लेखी अर्ज, घरपट्टी पावती, आरोग्य निरिक्षक पाहणी अहवाल | ७ दिवस | संबंधित प्रभाग समितीचे आरोग्य निरीक्षक व मुख्य आरोग्य निरीक्षक (मुख्या.) |
| ६ | जंतूनाशक व दुर्गधीनाशक औषध फवारणी | सन्मा. सदस्य अथवा स्थनिक नागरिकांच्या लेखी व तोंडी अथवा भ्रमणध्वनीद्वारे तक्रार | ३ दिवस | संबंधित प्रभाग समितीचे आरोग्य निरीक्षक व प्रभाग अधिकारी तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक (आरोग्य मुख्या.) |
| ७ | मलनि:सारण नलिका दुरुस्त करणे | बांधकाम विभागामार्फत | ३ दिवस | प्रभाग अधिकारी |
| ८ | भुयारी गटर नलिका तुंबलेबाबतच्या तक्रारी | बांधकाम विभागामार्फत | ३ दिवस | प्रभाग अधिकारी |
| ९ | गटारातील साचलेला गाळ काढणे | सन्मा. सदस्य अथवा स्थानिक नागरिकांच्या लेखी व तोंडी अथवा भ्रमणध्वनीद्वारे तक्रार | ३ दिवस | प्रभारी अधिकारी |

## ८ वैद्यकीय आरोग्य विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | लसीकरण सेवा उपलब्धतेबाबत | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे दररोज नियोजित ठिकाण सकाळी ९ ते दु.४.०० | वैद्यकीय अधिकारी |
| २ | विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहिम | शासनाचे आदेशानुसार | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ३ | मलेरिया प्रतिबंधक कारवाई | ३ दिवस | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ४ | प्रसुतिपुर्व माता तपासणी | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे | वैद्यकीय अधिकारी |
| ५ | शालेय किशोरवयीन मुला मुलींचे आरोग्य तपासणी | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | शालेय किशोरवयीन मुला मुलींचे आरोग्य तपासणी व समुपदेशन केंद्र | बुधवार व शुक्रवार स.११.३० ते २.०० वा. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ७ | लहान मुलांची आरोग्य तपासणी | नियोजित वेळेप्रमाणे | लहान मुलांचे तज्ञ |
| ८ | जोखीमीच्या गरोदर मातांची तपासणी व बालकांची तपासणी | नियोजित वेळेप्रमाणे | स्त्रीरोग तज्ञ |
| ९ | जननी सुरक्षा योजना | प्रसुतीनंतर ७ दिवसांचे आत मातेला पहिले व दुसरे प्रसुतीस अनुदान दिले जाते | वैद्यकीय अधिकारी |
| १० | कुटुंब कल्याण कार्यक्रम | शस्त्रक्रिया मंगळवार व गुरुवार | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ११ | शालेय व अंगणवाडी आरोग्य तपासणी कार्यक्रम | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे | वैद्याकीय अधिकारी |
| १२ | क्षयरोग रुग्ण तपासणी व औषधोपचार | मंगळवार,गुरुवार, शनिवार सकाळी ९ ते दु. २.०० वा. | शहर क्षयरोग अधिकारी |
| १३ | प्रसवपुर्व व प्रसुतीपश्चात गर्भलिंग चिकित्सा | दरमहा सोनोग्राफी केंद्र तपासणी व रिर्पोटींग | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १४ | दवाखान्यातील उपचाराच्या वेळा (बी.जी.पी. दवाखाना) | सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते १२ सायंकाळी ४ ते ६ | वैद्यकीय अधिकारी |
| १५ | कुष्ठरोग रुग्ण तपासणी | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १६ | हत्तीरोग रुग्ण तपासणी | नियोजित वेळापत्रकाप्रमाणे | वैद्यकीय अधिकारी |
| १७ | हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना देणे | ७ दिवस | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १८ | हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना नुतनीकरण | ७ दिवस | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १९ | आपत्कालीन वैद्यकीय सेवा | आपत्तीनुसार | वैद्यकीय आरोग्य अधिकारी व वैद्यकीय पथक |

## ∂ जन्म मृत्यु नोंदणीबाबत

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | तात्काळ नोंदणी केल्या जाणाऱ्या व १ वर्ष वयापर्यंतच्या केसेस संगणकात संग्रहित असल्यास त्याकरिता (अर्ज , हॉस्पिटलचे कार्ड) | १ दिवस | निबंधक |
| २ | १ वर्ष वयोमर्यादेपासून ते १० वर्ष वयोमर्यादेपर्यंतच्या केसेस नोंद उपलब्ध असल्यास त्याकरिता (अर्ज) | ३ दिवस | निबंधक |
| ३ | १० वर्ष वयोमर्यादेवरील केसेस नोंद उपलब्ध असलयास त्याकरिता (अर्ज) | ५ दिवस | निबंधक |
| ४ | अंतिम विधी दाखल्याकरिता (अर्ज, डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र, पंचनामा, स्मशान भुमिची पावती) | १ दिवस | निबंधक |
| ५ | जन्म - मृत्यु ना हरकत दाखला (अर्ज, रेशनिंग कार्ड, सत्य प्रतिज्ञापत्र, शाळेचा दाखला) | १ दिवस | निबंधक |
| ६ | जन्म प्रमाण पत्र दुरुस्तीकरिता (अर्ज, रेशनिंग कार्ड, सत्य प्रतिज्ञापत्र, शाळेचा दाखला, गॅजेट, हॉस्पिटलचे दुरुस्तीपत्र, अन्य शासकिय पुरावे) | कमाल ७ दिवस | निबंधक |

## ∂ शहर विकास

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | अनधिकृत इमारतीसंबंधीच्या बाबी | प्रथम नोटीस - ७ दिवस<br>MRTP नोटीस व कलम २६० - ३० दिवस | **प्रभाग अधिकारी**<br>प्र. स. क्र. ०१<br>०२५२२-२२०५२४<br>प्र. स. क्र. ०२<br>०२५२२-२२३५५५<br>प्र. स. क्र. ०३<br>०२५२२-२५००२५<br>प्र. स. क्र. ०४<br>०२५२२-२२३३३१<br>प्र. स. क्र. ०५<br>०२५२२-२५५३३७ |
| २ | धोकादायक इमारतीबाबत | मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये<br>१. ७ दिवसाची नोटीस<br>२. ७ दिवस कालावधी मालमत्ता धारकांनी इमारत पाडुन घेणेचा कालावधी<br>३. मनपास इमारत पाडावयाची झाल्यास ७ दिवस | |

## ८ नगररचना विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | भाग नकाशा | ७ ते १५ दिवस | नगररचनाकार<br>०२५२२ - २२३४५८ |
| २ | झोन दाखला | ७ ते १५ दिवस | |
| ३ | मंजूर विकास योजना अभिप्राय | ७ ते १५ दिवस | |
| ४ | आर्किटेक्ट लायसेन्स | ७ ते १५ दिवस | |
| ५ | बांधकाम परवानगी मंजुरी / बांधकाम सुरु करण्याचा दाखला | ६० दिवस | सहाय्यक संचालक,<br>नगररचनाकार<br>०२५२२ - २२०९६३ |
| ६ | पाया तपासणी | १५ दिवस | |
| ७ | पूर्णत्वाचा दाखला | २१ दिवस | |
| ८ | बांधकाम नुतनीकरण | १५ दिवस | |
| ९ | सर्व प्रकारच्या चौकशी / कागदपत्रातील त्रुटी पूर्णकरणे / बांधकाम परवानगीबाबत / मार्गदर्शन करणे / संबंधित अर्जदारांच्या वास्तुविशारद यांचेकडून समक्ष कागदपत्रांची पूर्तता करुन घेणे | कार्यालयीन वेळेत स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत | कनिष्ठ अभियंता |
| १० | विहीत नमुन्यातील अर्ज नियोजित काऊंटरवर मिळतील | कार्यालयीन वेळेत स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत | लिपीक |
| ११ | पैसे भरणेचे चलन देणे | कार्यालयीन वेळेत स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत | कार्यालयीन अधिक्षक |
| १२ | चलनाप्रमाणे पैसे भरणे | कार्यालयीन वेळेत स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत | कार्यालयीन अधिक्षक |
| १३ | बांधकाम परवानगी नाकारणेबाबत अर्जदारास निर्णय कळविणे | ६० दिवस | सहाय्यक संचालक,<br>नगररचनाकार<br>०२५२२ - २२०९६३ |
| १४ | बांधकाम परवानगी नुतनीकरण अर्जदारास निर्णय कळविणे | १५ दिवस | |
| १५ | पूर्णत्वाचा दाखल्याबाबत निर्णय कळविणे | ३० दिवस | |

## ∂ सार्वजनीक बांधकाम विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | रस्ता खोदाई परवानगी<br>सरकारी / खाजगी कंपनीसाठी | सुमारे ७ दिवस | कार्यालयीन अधिक्षक |
| २ | भुयारी गटारांमधील गाळ काढणे | प्रत्येक वर्षी ०१ एप्रिल ते ३० जुन पर्यंत प्रती वर्षी | प्रभाग अधिकारी |
| ३ | उघडी गटारे सर्वसाधारण दुरुस्ती | १५ दिवस | संबंधीत उप अभियंता |
| ४ | मनपा मैदानांचे आरक्षण | ७ दिवस | संबंधीत लिपीक |
| ५ | सांस्कृतीक केंद्र भाडयाने देणे | ७ दिवस | संबंधित प्रभाग अधिकारी |
| ६ | रस्त्यावरील किरकोळ स्वरुपाचे खड्डे भरणे | ७ दिवस | संबंधीत उप अभियंता |

## ∂ उद्यान/वृक्षसंवर्धन विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | धोकादायक वृक्ष पूर्ण काढणे/ विस्तार कमी करणे (महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ अन्वये) | किमान ६० दिवस अथवा झाडाची स्थिती पाहुन तात्काळ | वृक्ष अधिकारी / उद्यान अधिक्षक |
| २ | वृक्षसंवर्धन अनामत परतावा<br>(महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ११ अन्वये) दर ६ महिन्याला ३ वर्षापर्यंत वृक्षजतनबाबतचा अहवाल सादर करणे) | ३ वर्ष | |
| ३ | अधिकृत विकास बांधकामात बाधित होणारे झाड काढणे परवानगी३ वर्ष (महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ अन्वये) | कमाल ६० दिवस | |
| ४ | वृक्ष लागवड | जुन - जुलै ते सप्टेंबर - ऑक्टोबर व मागणीनुसार | |
| ५ | वृक्षसंवर्धन ना हरकत दाखला बांधकाम परवानगीसाठी (महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ अन्वये) | कमाल ६० दिवस | |
| ६ | वृक्षसंवर्धन ना हरकत दाखला बांधकाम परवानगीसाठी | कमाल ६० दिवस | |

## विद्युत विभाग ( रस्ता दिवाबत्ती )

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक जागेवर विद्युत व्यवस्था करणे | सुमारे ९० दिवस | कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| २ | सार्वजनिक जागेतील अथवा रस्त्यावरील दिवा बंद असणे (बिघडल्यामुळे ) | कमाल ३ दिवस | उप अभियंता (विद्युत) ०२५२२२५००५० |
| ३ | नाटयगृह भाडयाने देणे | ७ दिवस | नाटयगृह व्यवस्थापक |

## जलनि:सारण विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | ड्रेनेज कनेक्शन परवानगी देणे | ७ दिवस | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | ड्रेनेज कनेक्शन पुर्णत्वाचा दाखला देणे | ३ दिवस | |
| ३ | पाणीपुरवठा बांधकाम परवानगी ना हरकत दाखला देणे | ३ दिवस | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| ४ | ड्रेनेज बांधकाम परवानगी ना हरकत दाखला देणे | ३ दिवस | |
| ५ | पाणी पुरवठा व बांधकाम पुर्णत्वासाठी ना हरकत दाखला | ७ दिवस | |
| ६ | ड्रेनेज पुर्णत्वासाठी ना हरकत दाखला | ३ दिवस | |

## नळ जोडणी देणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराने नळ जोडणीसाठी आवश्यक ती फी भरणेबाबतचा कालावधी | कमाल ७ दिवस | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | नळ जोड मंजुरीचा आदेश देणेबाबत | ३ दिवस | |
| ३ | रस्ता खोदाई परवानगीबाबत | ७ दिवस | |

## किरकोळ स्वरुपाची कामे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मनपाच्या नियमीत पाणीपुरवठा खंडीत झाल्यानंतर त्याकालावधीत पाण्याचा पुरवठा | १ दिवस | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | कार्यक्रमासाठी पाण्याचा टँकर मिळणेबाबत | ३ दिवस | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |

∂

∂

∂ **पाणी पुरवठा**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्य पाण्याच्या नलीकेमधील गळती बंद करणे | कमाल ३ दिवस | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | पाणी दुषीत असलेबाबतच्या तक्रारी | कमाल ३ दिवस | |
| ३ | पाणी पुरवठा विस्कळीत व कमी दाबने होणेबाबतच्या तक्रारी | कमाल ३ दिवस | |
| ४ | पाणी बिलाबाबतच्या तक्रारी | ३ दिवसाचे आत | |
| ५ | पाणी बिलाच्या तक्रारी (पोस्टाने आलेल्या तक्रारी) | ३ दिवसाचे आत | |

∂ **बिलाबाबत**

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | पाणी बील देणे | दरमहा | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | पाणी बील देणे घरगुती वापर | त्रैमासीक | |
| ३ | बीलाची नक्कल मिळणेबाबतचा अर्ज | १ दिवस | |

∂ **संकीर्ण**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराच्या विनंती वरुन नळ कनेक्शन बंद करणे | ३ दिवसात | सहाय्यक आयुक्त प्र. स. क्र. १ ते ५ |
| २ | नळ कनेक्शन बंद केलेबाबतचा आदेश देणे | ३ दिवसात | |
| ३ | थकबाकी नसलेबाबतचा दाखला देणे व अनामत रक्कम परत करणे | १५ दिवसात | |
| ४ | थकबाकीमुळे खंडीत केलेला पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करणे | कमाल ३ दिवस | |

## ८ अग्निशामक विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | ना हरकत दाखल्याकरिता आवश्यक कागदपत्रे | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | सिनेमा गृह, प्रेक्षकगृह, पब्लीक हॉल इ.ना. हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>घरपट्टी / ॲग्रीमेंट कॉपी<br>अधिकृत एजेन्सीकडून अग्निशमन यंत्रणा लावल्याचे सर्टिफिकेट | ३० दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| २ | अ) मंगल कार्यालये ना-हरकत दाखला<br>ब) व्हीडोओ सेंटर ना-हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>घरपट्टी / ॲग्रीमेंट कॉपी<br>अधिकृत एजेन्सीकडून अग्निशमन यंत्रणा लावल्याचे सर्टिफिकेट | ३० दिवस<br>१५ दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ३ | पेट्रोल पंप ना-हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>घरपट्टी / ॲग्रीमेंट कॉपी<br>अधिकृत एजेन्सीकडून अग्निशमन यंत्रणा लावल्याचे सर्टिफिकेट<br>सात बारा उतारा<br>पेट्रोलियम सर्टिफिकेटस<br>पेट्रोल विक्री सर्टिफिकेटस<br>अटिंच्या दाखल्याची पुर्तता केल्याची माहिती | ३० दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ५ | एल.पी.जी.एजन्सी/गोदामे ना-हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>घरपट्टी / ॲग्रीमेंट कॉपी<br>अधिकृत एजेन्सीकडून अग्निशमन यंत्रणा लावल्याचे सर्टिफिकेट<br>सात बारा उतारा<br>पेट्रोलियम सर्टिफिकेटस<br>पेट्रोल विक्री सर्टिफिकेटस | ३० दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ६ | अ) हार्डवेअर दुकाने ना-हरकत दाखला<br>ब) मिठाई दुकाने ना-हरकत दाखला<br>क) रॉकेल साठा व विक्री ना-हरकत दाखला<br>ड) हॉटेल ना-हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>घरपट्टी / ॲग्रीमेंट कॉपी<br>क्षेत्रफळानुसार व एकूण स्टॉकनुसार फायर एक्स्टींग्युशर्स खरेदी करुन बसविल्याचे सर्टिफिकेट | १५ दिवस<br>१५ दिवस<br>१५ दिवस<br>१५ दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ७ | हायराईज इमारत बांधकाम परवानगी (अटिंचा) दाखला | नगररचना विभागकडून वर्ग करण्यात आलेले प्राप्त अर्ज फाईल नकाशासह | ३० दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |

## अग्निशामक विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | हायराईज इमारत वापर ना हरकत दाखला (कंम्प्लेशन सर्टिफिकेट देणेकरिता बिल्डिंग बांधकाम पूर्ण होणे गरजेचे असल्याने त्याचा कालावधी एक ते दीड वर्ष एवढा लागतो) | नगररचना विभागाकडून वर्ग करण्यात आलेले प्राप्त अर्ज फाईल नकाशासह. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अधिनियम क्र. ३ भाग -४, २००७ शासन राजपत्रानुसार अधिकृत एजेंन्सी कडून हायड्रंट, डाऊन कमर, वेट रायझर, ड्राय रायझर, फस्टेड होज रिल, फायर एक्स्टींग्युशर्स, पुरेसा पाण्याचा साठा इ. अग्निशमन यंत्रणेची टेस्टिंग कुन सर्टिफिकेट घेतल्यानंतर कम्प्लेशन सर्टिफिकेट दिले जाते. | पुर्णत्वाचा दाखला पासुन वापर परवाना देणेपुर्वी | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १२ | अ) सर्कस ना-हरकत दाखला<br>ब) टुरिंग थिएटर ना-हरकत दाखला<br>क) प्रदर्शन ना-हरकत दाखला<br>ड) शामीयाना/पेंडॉल ना-हरकत दाखला | अर्ज ५ रुपयांचे कार्ट फी स्टँपसह<br>ॲग्रीमेंट कॉपी<br>जागेच्या मालकाचा ना हरकत दाखला<br>क्षेत्रफळानुसार फायर एक्स्टींग्युशर्स खरेदी करुन बसविल्याचे सर्टिफिकेट | ७ दिवस<br>७ दिवस<br>७ दिवस<br>७ दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १६ | स्टॅंडबाय डयुटी कामी फायर इंजीन सर्व्हिस चार्ज | मनपा स्थायी समिती ठराव क्र. २६, दि. ३०/०१ /२००९ नुसार<br>कार्यक्षेत्रात रु. ३००० (पहिल्या सहा तासाकरिता रु. २००) फायर इंजिन सर्व्हिस चार्ज फी शुल्क<br>कार्यक्षेत्राबाहेर रु. ५००० (पहिल्या सहा तासाकरिता रु. ५००) फायर इंजिन सर्विस चार्ज फी शुल्क | ३ दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १७ | पाणी फवारणी वाटप पंपिंग | शासन परिपत्रक क्र. अशस १४०८/ ४२९/ नवि - २४, मंत्रालय मुंबई - ३२, दि. १७ एप्रिल २००७ महासभा ठराव क्र. ७७, दि. २९/११/ २००८ नुसार अग्निशमन वाहानांचा उपयोग तथा रस्ते धुणे, पाणी वाटपकामी करता येत नाही. | | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १८ | प्रशिक्षण प्रात्याक्षिके | मनपा स्थायी समिती ठराव क्र. ३६, दि. ३०/०१/ २००९ नुसार कार्यक्षेत्रात प्रशिक्षण रु. ६० (प्रति उमेदवार) फी शुल्क कार्य क्षेत्राबाहेर प्रशिक्षण संस्थेसाठी रु. ६०० (प्रति उमेदवार रु. ८०) फी शुल्क कार्य क्षेत्रा बाहेर प्रशिक्षण संस्थेसाठी (कंपनी, कारखाने व इतर दोन तास (रु. ८००) फी शुल्क | ७ दिवस | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |

## उद्योगधंदा परवाना विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | आवश्यक कागदपत्रे | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | उद्योगधंदा परवाना | आवश्यक त्या व्यवसायासाठी<br>१) जागेच्या मालकी हक्का बाबतचे कागद पत्रे<br>२)कारखाना नोंदणी व कारखाना चालविण्याचा परवाना (फॅक्टरी लायसन्स)<br>३)महाराष्ट्र पोल्युशन कंन्ट्रोल बोर्ड (MPCB)<br>४) मनपाच्या पर्यावरण विभागाकडील दाखला<br>५) अग्निशमन दलाचा दाखला<br>६) E.T.P. (Effluant treatment Plant)<br>७) चालू वर्षाची घरपट्टी पावती.<br>८) वॉटर अनलायसेस रिपोर्ट | १५ दिवस | परवाना अधिक्षक |
| २ | उद्योगधंदा परवाना नुतनीकरण | १) परवानाची मुळ प्रत सोबत संबधीत सर्व परवानांची नुतनीकरण झाल्याबतचा पुरावा. | ७ दिवस | |
| ३ | व्यवसाय /साठा परवाना | आवश्यक त्या व्यवसायासाठी १) जागेच्या मालकी हक्काबाबतचे कागद पत्रे<br>२)चालू वर्षाची घरपट्टी पावती<br>३)पोलीस विभागाचा ना हरकत दाखला<br>४) अन्न व औषध प्रशासन म.रा. ठाणे यांचा दाखला | ७ दिवस | |
| ४ | व्यवसाय/साठा परवाना नुतनीकरण | १) परवान्याची मुळ प्रत सोबत संबंधित सर्व परवानांची नुतनीकरण झाल्याबाबतचा पुरावा. | ७ दिवस | |
| ५ | आकाशचिन्ह परवाना | १) अर्ज २) जागेसंबंधी मालकी हक्क पुराव्याबाबत कागदपत्रे ३) वाहतुक पोलीसांची परवानगी. | १५ दिवस | |
| ६ | आकाशचिन्ह परवाना नुतनीकरण | १) परवानाची मुळ प्रत सोबत संबंधीत सर्व परवानांची नुतनीकरण झाल्याबाबतचा पुरावा. | ७ दिवस | |

## ϑ मार्केट विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मनपाने दिलेल्या पक्के गाळेधारकाकडून दरमहा भाडे वसुल करणे | १० दिवस | प्र. मार्केट विभाग प्रमुख |
| २ | मनपाने दिलेल्या लाकडी कॅबिनचे दरमहा तात्पुरते भाडे वसुल करणे | १० दिवस | |
| ३ | मटण परवाने देणे | ८ दिवस | |
| ४ | मटण परवाने नुतनीकरण करणे | ७ दिवस | |
| ५ | मटण मार्केट सफाई करणे | १ दिवस | |

## ϑ करसंकलन विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मिळकत कर आकारणी रजिस्टर उतारा देणे | ३ दिवस | प्रभाग अधिकारी |
| २ | नवीन कर आकारणी नोंद करणे<br>अ) हरकत आल्यास<br>ब) हरकत न आल्यास | <br>६० दिवस<br>३० दिवस | करमुल्यांकन अधिकारी |
| ३ | मिळकतीचे हस्तांतरण करणे (खरेदी-विक्रीने) | १५ दिवस | प्रभाग अधिकारी |
| ४ | मिळकतीचे हस्तांतरण वारसा हक्काने असल्यास | ३० दिवस | प्रभाग अधिकारी |
| ५ | स्वयंमुल्य करनिर्धारण योजना<br>(Self Assessment ) | ३० दिवस | करमुल्यांकन अधिकारी |

## ϑ जकात विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | जकात अनामत परतावा (धनादेश) | ७ दिवस | सहाय्यक आयुक्त (जकात) |
| २ | खाजगी शुल्क-बंध वखार परवाना | ३० दिवस | |
| ३ | रहदारी पास | १२ ाास | |

# सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

| अ.क्र | विभागाचे नांव | आवश्यक कागदपत्रे | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | बी. पी. एल. यादीत समाविष्ट असल्यास दाखला | रेशनिग कार्ड झेरॉक्स<br>ओळखपत्र / रहिवासी दाखला | कमाल ३ दिवस | विभाग प्रमुख |
| २ | नावात दुरुस्ती करुन नविन दाखला | बी . पी. एल. प्रमाणपत्र झेरॉक्स<br>रेशनिग कार्ड झेरॉक्स<br>ओळखपत्र / रहिवासी दाखला | कमाल १५ दिवस | विभाग प्रमुख |
| ३ | महिलांचे बचत गट नविन करुन देणे | बीपीएल कुटूबांतील किमान ५ महिला<br>बीपीएल प्रमाणपत्र झेरॉक्स<br>पासपोर्ट साईज फोटो (प्रत्येकी १ फोटो)<br>रेशनिंग कार्ड झेरॉक्स<br>रहिवासी दाखला / पॅन कार्ड झेरॉक्स | कमाल १५ दिवस | प्रकल्प अधिकारी |
| ४ | बचत गटांना सामुहिक व्यवसाय करणेचा प्रस्ताव बँकेत सादर करणे | बचत गटातील सभासदाचे बीपीएल प्रमाणपत्र झेरॉक्स, बचत गट पासबुक झेरॉक्स<br>सर्व सभासदांचे रेशनकार्ड झेरॉक्स<br>घरपट्टी व पाणीपट्टी भरलेल्या पावतीची झेरॉक्स (असल्यास)<br>प्रत्येक सभासदाचा पासपोर्ट साईज फोटो (दोन)<br>बचत गटाच्या ठरावाची प्रत<br>व्यवसाय करणेचे जागेचा पुर्ण पत्ता किंवा व्यवसायाची जागा भाडयाची असल्यास भाडेकरार जोडणे , व्यवसायाचे दरपत्रक<br>बचतगटाचा संपुर्ण पत्ता , रहिवासी दाखला<br>सर्व सभासदाचे विज बिल (असल्यास) | कमाल १५ दिवस | प्रकल्प अधिकारी |
| ५ | स्वयंरोजगारासाठी कर्ज मिळणेचा प्रस्ताव बँकेत सादर करणे | बी . पी. एल. प्रमाणपत्र झेरॉक्स<br>रेशनिग कार्ड झेरॉक्स<br>पासपोर्ट साईज फोटो (दोन)<br>रहिवासी दाखला<br>व्यवसाय करणेचे जागेचा पुर्ण पत्ता किंवा व्यवसायाची जागा भाडयाची असल्यास भाडेकरार जोडणे<br>शाळा सोडलेचा दाखला (असल्यास)<br>व्यवसायाचे कोटेशन<br>विज बिल | कमाल १५ दिवस | प्रकल्प अधिकारी |
| ६ | बँकेने कर्ज मंजूर केल्यावर अनुदान मंजूर करणे | संबंधित बँकचे कर्ज मंजुरीचे पत्र प्राप्त झाल्यावर | कमाल १५ दिवस | विभाग प्रमुख |
| ७ | स्वयंरोजगार / रोजगार उपलब्ध होणेकामी प्रशिक्षण देणे | शाळा सोडल्याचा दाखला , रेशनकार्ड झेरॉक्स बीपीएल प्रमाणपत्र झेरॉक्स , पासपोर्ट साईज फोटो (दोन), रहिवाशी दाखला | १५ दिवस | |

## लेखा विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | टि डी एस प्रमाणपत्र देणे | ७ दिवस | लेखाधिकारी |

## ∂ पर्यावरण विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | आवश्यक कागदपत्रे | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | डाईंग सायझिंग ना हरकत प्रमाणपत्र | विहीत नमुन्यातील अर्ज , घरपट्टी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र | १५ दिवस | पर्यावरण सल्लागार ०२५२२-५२२५६५ |

## ∂ अभिलेखा विभाग

| अ.क्र | विभागाचे नांव | काल मर्यादा | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | असेसमेंट उतारा देणे | अर्ज प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांत | अभिलेखा विभागप्रमुख सर्व विभागाप्रमुख प्रभाग अधिकारी |
| २ | ठरावांच्या नकला देणे | | |
| ३ | टाऊन प्लॅनिंग परवानगीची प्रत, नकाशाची झेरॉक्स | | |
| ४ | इतर दस्तऐवजांच्या नकला | | |

**- : टीप : -**

- **वरील सेवा पुरविण्यासाठी महानगरपालिका/नगरपालिका यांनी नियमानुसार निर्धारित केलेला कर नागरिकांनी भरणे हे त्यांचे कर्तव्य आहे.**

## महानगरपालिकांचे दूरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नांव | STD कोड नंबर | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | २२ | २२६२०२५१ |
| २ | ठाणे महानगरपालिका | ०२२ | २५३३१५९० |
| ३ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | ०२५१ | २२०६२०६ |
| ४ | नवी मुंबई महानगरपालिका | ०२२ | २७५७७०७० |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका | ०२५१ | २७२०११६ |
| ६ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका | ०२५२२ | २५५३१४ |
| ७ | मिरा-भाईदर महानगरपालिका | ०२२ | २८१९२८२८ |
| ८ | वसई-विरार महानगरपालिका | ०२५० | २३०९०२० |
| ९ | नाशिक महानगरपालिका | ०२५३ | २५७७७९३० |
| १० | मालेगाव महानगरपालिका | ०२५५४ | २३१८०० |
| ११ | अहमदनगर महानगरपालिका | २४१ | २३४३६२२ |
| १२ | धुळे महानगरपालिका | ०२५६२ | २३५०६६ |
| १३ | जळगांव महानगरपालिका | ०२५७ | २२२२२६१ |
| १४ | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका | ०२० | २७४२५५६५ |
| १५ | पुणे महानगरपालिका | ०२० | २५५०१००० |
| १६ | सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिका | ०२३३ | २३७३७२१ |
| १७ | सोलापूर महानगरपालिका | ०२१७ | २७४० ३३१ |
| १८ | कोल्हापूर महानगरपालिका | ०२३१ | २५४०२९१ |
| १९ | औरंगाबाद महानगरपालिका | ०२४० | २३३३५३६ |
| २० | नांदेड-वाघाळा महानगरपालिका | ०२४६२ | २३४७१०/२३०७१० |
| २१ | अमरावती महानगरपालिका | ०७२१ | २६७६४६९ |
| २२ | अकोला महानगरपालिका | ०७२१ | २४३५५०३ |
| २३ | नागपूर महानगरपालिका | ७२१ | २५६७००१ |
| २४ | लातूर महानगरपालिका | ०२३८२ | २४६०७५ |
| २५ | परभणी महानगरपालिका | ०२४५२ | २२३८०९ |
| २६ | चंद्रपूर महानगरपालिका | ०७१७२ | २५०२२० |